20-21 – [illegible]

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX Issue - II APRIL - JUNE - 2020

MARATHI PART - II

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Journal No. 40776

TRUE COPY

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

PRINCIPAL
SHANKARRAO JAGTAP ARTS &
COMMERCE COLLEGE, WAGHOLI
Tal-Koregaon, Dist-Satara

VOLUME - IX, ISSUE - II - APRIL - JUNE - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेती विषयक विचार<br>प्रा. डॉ. चंद्रकांत सरदार | १-३ |
| २ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वकिली व्यवसायविषयक विचार<br>प्रा. दत्तात्रय रामकिशनराव मुंडे | ४-८ |
| ३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक व शिक्षणविषयक विचार<br>प्रा. डॉ. जितेश नारायण चव्हाण | ९-१५ |
| ४ | महाडची सामाजिक क्रांती : चवदार तळे सत्याग्रहाच्या विशेष संदर्भात<br>प्रा. डॉ. कैलाश फुलमाळी | १६-२० |
| ५ | हिंदूकोड बिल आणि बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री उन्नती विषयक विचार<br>प्रा. मनिषा श्रेणिककुमार पाटील | २१-२३ |
| ६ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आर्थिक विचार<br>डॉ. मीना गीताराम मेहत्रे | २४-२८ |
| ७ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दीक्षाभूमी<br>डॉ. ओमशिवा लिगाडे | २९-३१ |
| ८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महिला सक्षमीकरणासाठी योगदान<br>डॉ. पौर्णिमा शिरिष कोल्हे | ३२-३४ |
| ९ | नवभारताच्या घटनेचे प्रमुख शिल्पकार : डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>श्री. अजितकुमार भिमराव पाटील | ३५-४० |
| १० | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार - एक काळाची गरज<br>प्रा. रसाळ दशरथ किसन<br>प्रा. डॉ. विष्णु बी. वाघमारे | ४१-४५ |
| ११ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा ओबीसी बाबतचा दृष्टीकोन<br>प्रा. भाऊसाहेब खंडू सांगळे | ४६-४८ |
| १२ | इतिहास लेखन, पुर्नलेखन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>डॉ. सावंत जयपाल चंद्रकांत | ४९-६२ |
| १३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतीविषयक विचार<br>प्रा. परमेश्वर दत्तराव यादव | ६३-६७ |


I

VOLUME - IX, ISSUE - II - APRIL - JUNE - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# १२. इतिहास लेखन, पुर्नलेखन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर

डॉ. सावंत जयपाल चंद्रकांत
शिवाजी विद्यापीठ संलग्नीत शंकरराव जगताप आर्टस अॅण्ड कॉमर्स कॉलेज वाघोली, ता. कोरेगाव, जि. सातारा.

## प्रस्तावना

या शोधनिबंधामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकिय इतिहासाच्या विश्लेषित करण्याला इतिहास म्हणून पुर्णत: स्विकारलेले नाही. आजही अनेक भारतीय लेखकांच्या ऐतिहासिक संशोधन पध्दतीच्या ग्रंथात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची इतिहासाची व्याख्या मांडण्यात आलेली दिसत नाही. ही परिस्थिती येण्याचे कारण म्हणजे आजही भारतीय जातिप्रथा आणि अस्पृश्यता या दोन मुद्यांना भारतीय इतिहासात महत्वाचे स्थान प्राप्त झालेले नाही. आजही जातीसंदर्भातील अभ्यास भारतात सामान्यत: समाजशास्त्रज्ञ आणि मानववंशशास्त्रज्ञच करतात आणि दुसरी महत्वाची बाब म्हणजे भारतीय इतिहास संशोधनामध्ये ज्या संशोधन पध्दतींचा वापर केला जातो त्या सर्व युरोपियन म्हणजेच पाश्चिमात्य पध्दती आहेत. उदा. मार्क्सवाद, उपयोगितावाद, संरचनावाद, उत्तरसंरचनावाद इ. होय. या सर्व विचारसरणींच्या बाबतीत काही वाईट नाही परंतू यांचा अभ्यास करताना आपले अभ्यासक म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर किंवा पेरियार यांच्या ऐतिहासिक अभ्यासास कोणतीच जागा देत नाहीत. त्यामुळेच मी या संशोधनातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या इतिहास अभ्यासाच्या दृष्टीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर इतिहासाची व्याख्या मांडताना म्हणतात कि, "इतिहासाकडे नेहमी बदल म्हणून पहावे. कारण इतिहास हा नेहमी राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक आणि सांस्कृतिक स्थिती बदलवीत असतो म्हणून इतिहास म्हणजे बदल"

इतिहासकाराचे कर्तव्य काय याबाबत मार्गदर्शन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर गांधी यांचे विश्लेषण देतात "असत्यापासून सत्याचा निवाडा करणे, अनिश्चितापासून निश्चिततेला वेगळे काढणे आणि निश्चयात्मकपणे अमान्य होण्यासारख्या बाबींपासून शंकास्पद बाबी वेगळ्या करणे हेच इतिहासकाराचे कर्तव्य होय. संशोधकासमोर जी माहिती उपलब्ध असेल तिच्याकडे साकल्याने न्यायाधिशाच्या निष्पक्षपाती दृष्टीकोनातून त्याने पाहिले पाहिजे. एखाद्या घटनेविषयी केलेले विधान पुराव्यानुसार पाहता कितपत परिपुर्ण व स्पष्ट आहे याचा विचार करावयास हवा आणि त्याबद्दल नंतरच आपला निष्कर्ष काढून आपला अभिप्राय द्यावयास पाहिजे. मग तो निष्कर्ष पूर्वीच्या इतिहासतज्ञाने नोंदवलेल्या मताशी जुळणारा असो की नसो."[१]

PRINCIPAL
SHANKARRAO JAGTAP ARTS &
COMMERCE COLLEGE, WAGHOLI
Tal-Koreg... Dist-Satara.